पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११०१८
लेखा व वित्त विभाग
मुंबई पुणे रोड, पिंपरी, पुणे ४११ ०१८,
Website – pcmcindia.gov.in
E-mail – account@pcmcindia.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जावक क्र.लेखा/२९/कावि/७८८/२०२२

दिनांक :- ५/ ८/२०२२

# परिपत्रक

विषय:- मनपा कार्यालयीन वाहनांकरीता प्रिपेड पेट्रो कार्ड च्या सुविधेबाबत.

मा.आयुक्त सो यांनी दि.२७/०५/२०२२ रोजी मनपातील विविध विभाग व अधिकारी यांच्या वाहन इंधनाकरीता बँक ऑफ बडौदा , पिं.चिं.म.न.पा शाखा यांचेमार्फत प्रिपेड पेट्रो कार्ड ची सुविधा घेणेस मंजुरी दिलेली आहे. मा.प्रशासक यांचे मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.४८१ दि.२६/०७/२०२२ अन्वये मनपा कार्यालयीन वाहनांकरीता प्रिपेड पेट्रो कार्ड ची सुविधा सुरू करून त्याकरीता आगाऊ रक्कम अदा करणेस मंजुरी दिलेली आहे. त्यानुसार बँक ऑफ बडौदा यांचेकडून मनपातील विविध विभागांना वाहननिहाय प्रिपेड पेट्रो कार्ड देणेत आलेले आहे. यापुढे वाहनाकरीता वाहन इंधन भरणेकरीता आर्थिक व्यवहार या प्रिपेड कार्डाव्दारे होणार असल्याने या प्रिपेड कार्डाकरीता बँकेकडून विभागांनी दिलेल्या मागणीनुसार र.रू.१०,०००/- ते र.रू.३०,०००/- पर्यंत आगाऊ रक्कमा देणेत आलेल्या आहेत. त्यानुसार विभागांनी सदर प्रिपेड कार्डचा वापर सुरू केलेला आहे. परंतु असे निदर्शनास आले आहे की, काही विभागांनी सदर कार्डचा वापर सुरू केलेला असून त्यामधील देणेत आलेली संपूर्ण रक्कम खर्च केली आहे परंतु केलेल्या खर्चाची प्रतिपूर्ती करून लेखा विभागाकडे अदायगीकामी देयके सादर केलेली नाहीत. त्यामुळे सदर प्रिपेड कार्डवर पुन्हा रक्कमा जमा झालेल्या नाहीत. त्यानुसार सर्व संबंधीत विभागांना सुचीत करणेत येते की, विभागांनी यापुढे त्यांना प्रिपेड कार्डवर देणेत आलेल्या रक्कमांचे योग्य ते नियोजन करून कार्डवर खर्च करणेकरीता पूरेशी शिल्लक रक्कम ठेऊन वेळोवेळी झालेल्या खर्चाची देयके प्रतिपूर्तीकामी तातडीने लेखा विभागाकडे सादर करावीत. विभागांनी देयके संगणक प्रणालीमध्ये तयार करताना ई-सीएस व्दारे करावयाचे असून पैसे घेणा-याचे नाव ( Party name ) या ठिकाणी वाहन क्रमांक टाकावा व बँक खाते क्रमांक (Bank A/c No.) या ठिकाणी प्रिपेड कार्ड क्रमांक टाकावा व इतर संबंधीत तपशिल भरणेत यावा. ज्या विभागांनी अद्याप बँकेकडून सदरे प्रिपेड पेट्रो कार्ड घेतलेले नाही त्यांनी तातडीने सदरचे कार्ड घेऊन त्याचा वापर सुरू करावा. ज्या विभागांनी सदरचे कार्ड बँकेकडून घेतलेले नाही त्यांची देयके लेखा विभागाकडे स्विकारली जाणार नाहीत. सदर परिपत्रकाची नोंद सर्व संबंधीत विभागांनी घेणेत यावी व सर्व संबंधीत कर्मचारी यांचे निदर्शनास आणून देणेत यावे.

( जितेंद्र कोळंबे ) ५/८
मुख्य लेखा व वित्त अधिकारी
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी

प्रत:-

सर्व विभाग